# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०१/०३/२०१८

## विविध गावातील गावकऱ्यांनी केली ०५ भरमार रायफल जमा

नक्षलवादयांनी पुकारलेल्या टी.सी.ओ.सी. दरम्यान भामरागड उपविभागात एल.आर.पी./एस.आर.पी.च्या माध्यमातून नक्षलविरोधी अभियान तीव्र करून विविध गावातील ग्रामस्थांची ग्राम भेट घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना शासनाच्या विविध योजना समजावून सांगितल्या व त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला.

आज दिनांक ०१/०३/२०१८ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी भामरागड श्री. तान्हाजी बरडे सा ो. यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली नक्षलदृष्टया अतिसंवेदनशिल अशा मौजा हितापडी, राणीपोडुर, दोबूर या गावांची ग्राममिटिंग घेतली असता विविध गावातील ए.आर.डी./जी.आर.डी. यांना त्यांच्याकडील भरमार रायफल जमा करण्याचे आव्हान केले असता त्यांनी त्यांच्याकडील ०५ भरमार रायफल मा. उपविभागीय पोलीस अधिकारी भामरागड श्री. तान्हाजी बरडे सा ो. यांच्या समोर जमा करून विकासाच्या मुख्य प्रवाहात सामाविष्ठ होण्याचा निर्णय घेतला.

अतिदुर्गम अशा गावातून भरमार रायफल जमा झाल्याने ग्रामीण जनतेत लोकशाही बद्दल व पोलीसांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाल्याचे दिसत आहे. तसेच पोस्टेच्या वतीने भरमार रायफल जमा करणाऱ्या ग्रामस्थांना पुष्पगुच्छ देऊन व भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला. यावेळी पोस्टे भामरागड चे प्रभारी अधिकारी श्री. सुरेश मदने व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. इतर गावकऱ्यांनी सुध्दा या गोष्टींचा आदर्श घेवून नक्षलविरोधी अभियानात सामिल होण्याचे आवाहन मा. प्रभारी पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. महेश्वर रेड्डी सा ो. यांनी केले आहे.